**पुस्तक परिचय**

# मर्मभेदक दृष्टीचा प्रत्यय देणारी संहिता


**दीपक बोरगावे**





समाजहिताचा व्यापक विचार करून वैचारिक लेखन करण्यासाठी तुमच्याकडे तत्त्वज्ञानाची बैठक असावी लागते. यासाठी व्यक्तिवादाचा विचार दूर सारून समष्टीप्रधान दृष्टीस स्वीकारावे लागते. ठाम भूमिका, व्यापक विश्लेषण दृष्टी आणि हेतूंची स्पष्टता म्हणजेच आपण कुणासाठी आणि का लिहीत आहोत याबद्दलची काहीएक निश्चितता. सुभाष थोरातांचे 'वर्तमानाची बखर' (२०१५) हे पुस्तक या सर्व कसोट्यांवर उतरणारे आहे असे वाटते. चार विभागांत विखुरलेले हे पुस्तक विविध विषयांना स्पर्श करणारे आहे. यामध्ये साहित्य, संस्कृती, धर्म, दलितांवरील अन्याय, राजकारण, महामानवांचे कार्य आणि त्याचे आजच्या वर्तमानाशी असलेले नाते, तत्त्वज्ञान, 'फँड्री' आणि 'देऊळ' यासारख्या चित्रपटांची चर्चा, जातसंस्थेची मूलगामी संभाषिते, अंधश्रद्धा निर्मूलन अशा अनेक विषयांची चर्चा या पुस्तकात येते. इतक्या विविध विषयांचा परामर्श घेत असताना थोरात आपल्या ठाम वैचारिक आणि राजकीय भूमिकेपासून जरासुद्धा ढळत नाहीत ही विशेष गोष्ट पुस्तक वाचताना लक्षात राहते. त्यांची वैचरिक बैठक ही मार्क्सवादी विचाराची आहे, म्हणूनच हे घडताना दिसते.

२००२ पासून २०१५पर्यंत 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र', 'साप्ताहिक जीवनमार्ग' आणि अनियतकालिक 'श्रमिक विश्व' यातून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह या पुस्तकात केला आहे. 'कीर्तीरूपी उरावे' या पहिल्याच भागात तुकाराम, एंगल्स, जोतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, स्टॅलिन, क्यूबाचे चे, नेल्सन मंडेला आदी महामानवांवर चिंतनपर लेखन आहे. तुकाराम आणि मार्क्स यांच्यातील साम्यस्थळे दाखवत दोघांचीही कीर्ती ही जनसामान्यांत जिवंत का आहे हा प्रश्न थोरात विचारतात. आजही 'तुकया' हा शब्द उच्चारल्याशिवाय


ईमेल : deepak.borgave7@gmail.com

एकही दिवस शेतात राबणाऱ्यांचा उजाडत नाही; तेच मार्क्सचेही. जोतिबा फुले आणि मार्क्स हे समकालीन होते पण जोतिबांना मार्क्ससारख्या अभ्यासाच्या सुविधा नव्हत्या. इतिहासाच्या ह्या मर्यादा ओलांडून जोतिबांनी मार्क्सइतकाच मूलगामी विचार आधुनिक भारतात पेरला आणि त्याचे पर्यवसान डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांसारखे महामानव निर्माण होण्यात झाले आणि त्यामुळेच आधुनिक भारताचा पाया रचला गेला.

या भागात क्यूबन क्रांतिकारक चे आणि नेल्सन मंडेला यांच्या क्रांतिलढ्यातील योगदानाबद्दलचे लेख केवळ अप्रतिम आहेत. या थोर क्रांतिकारकांबद्दल लिहिताना थोरात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचेही विश्लेषण करतात. चे आणि मंडेला यांचा आलेख मोठा असूनसुद्धा थोरात अगदी संक्षिप्तपणे त्यांचे चित्र रेखाटतात. राजकीय वैचारिक लेखनाचा एक वस्तुपाठ ठरावा अशीच त्यांची लेखनशैली म्हणावी लागेल.

या चिंतनातून थोरात इतिहासलेखनाचा एक महत्त्वाचा मुद्दा मांडतात. शेजवलकरांनी म्हटल्याप्रमाणेच भारतात ब्राह्मणी वर्चस्ववाद टिकवण्यासाठी इतिहासलेखन झालेले आहे. शाहूंच्या राज्यात ब्राह्मणांना थारा नव्हता त्यामुळे महाराजांबद्दल खोट्यानाट्या गोष्टी त्यांनी पसरवल्या. बुद्धापासून सुरू झालेल्या हा जातिव्यवस्थेविरुद्धचा संघर्ष ब्राह्मणवादाने आजही जोपासला आहे, त्यात नवनव्या षडयंत्रांची भरच दिवसेंदिवस पडत आहे, यात आपणही सहभागी आहोत याची चिकित्सा आणि कठोर आत्मपरीक्षण करायला हवे. आजचे बहुजनवादी जातीनिहाय संघटना बांधत आहेत – मराठा महासंघ, संभाजी ब्रिगेड वगैरे. हे सर्व ब्राम्हणवादाला पोषकच आहे. लंडनमध्ये मोदी सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर राहत होते ते घर ३.१ मिलियन पौंडस्‌ला विकत घेतले; मुंबईमधील इंदू मिलच्या ठिकाणी बाबासाहेबांचे भव्यदिव्य स्मारक उभारणे ह्या सर्वच गोष्टी भाजप सरकार अगदी उत्साहाने करत आहे. यामुळे आमचे दलितबंधू हुरळून गेले. पण हिंदुत्ववादी, आंबेडकरांचे यातून विकृतीकरण करून ऐतिहासिक खोटारडेपणा करत आहेत; हे आम्हा सर्वांनाच समजायला हवे. यात ते आंबेडकरांबद्दल काहीही म्हणजे अक्षरशः काहीही सांगत आहेत. उदा. बुद्ध धर्म हा हिंदू धर्माचाच एक पंथ होता; आंबेडकरांना संघपरिवाराचे कौतुक होते वगैरे. अशा नोंदी आनंद तेलतुंबडे यांनी अलीकडच्याच इपीडब्यूच्या (EPW, 3 Oct. 2015) एका लेखात केल्या आहेत. थोडक्यात इतिहासाचे भान ठेवून इतिहासाचे विकृतीकरण होत असेल तर त्याला प्राणपणाने विरोध करायला हवा. हा एक महत्त्वाचा मुद्दा या पुस्तकात सर्व लेखांतून पार्श्वभूमीसारखा उमटत राहतो.

धर्म, जात आणि राजकारण या विभागाची सुरुवातच ही मार्क्सच्या सुप्रसिद्ध धर्मविवेचनाने आणि उपसंहितेने होते. मार्क्स म्हणतो, 'धार्मिक दुःख हे एकाच वेळी खऱ्या दुःखाची अभिव्यक्ती व खऱ्या दुःखाविरुद्धची तक्रार आहे. धर्म हा जुलुमाच्या भरडल्या जाणाऱ्या जनतेचा निःश्वास आहे. अचेतन परिस्थितीमधील चैतन्य आहे. जनतेला भूल पाडणारी अफू आहे.' आज मोदींच्या राज्यात धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचा धोका निर्माण झाला आहे. पंधराएक वर्षांपूर्वी जर कोणी अशी भविष्यवाणी केली असती तर अशी परिस्थिती उद्‌भवेल यावर कोणाचा विश्वासही बसला नसता. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे देश इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान यांची प्रगती झाली नाही; हे सर्व देश आजही मध्ययुगीन अंधारयुगामध्येच चाचपडताना दिसतात. हिंदू राष्ट्रवादही ह्याच प्रकारचा आहे. फरक येवढाच की हे प्राचीन भारतात रमतात. डॉ. आंबेडकरांनी घटनेत नमूद केलेल्या लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ह्या तत्त्वानुसार आपण गेल्या पासष्ट वर्षांत औद्योगिक कृषी सिंचनक्षेत्रात प्रगती केली. हिंदू राष्ट्रवादानुसार जर आपण गेलो असतो तर देशात यादवी झाली असती जातीय दंगलींची एक न संपणारी मालिका सुरू झाली असती. इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान यांचे जे झाले तेच आपलेही झाले असते.

थोरातांनी 'धर्माधिष्ठित राष्ट्रवादाची आणि दहशतवाद आणि धर्म' या लेखात धर्म, समाज, परिवर्तन, ब्रिटिशांचे वसाहतवादी राजकारण, वसाहतवादाला आवश्यक असणारी धर्माधिष्ठीत राष्ट्रवाद आणि दहशतवाद याची गरज, स्टुअर्ट मिल यांची या सर्व इतिहासलेखनाला मिळणारी सैद्धांतिक पुष्टी, यातून जमातवादाचा निर्माण झालेला धोका, मुख्य म्हणजे राष्ट्रवादाच्या निर्मितीचा प्राचीन काळापासूनचा घेतलेला वस्तुनिष्ठ आढावा आणि यातले सामाजिक धार्मिक व आर्थिक राजकारण यामुळे या संदर्भातले एक मानवी इतिहासाचा व्यापक पट आणि एक

मूलभूत चिंतनच त्यांनी या लेखातून मांडले आहे असेच म्हणावे लागेल. हिंदुत्ववाद्यांनी मुस्लीमद्वेष पसरवण्यात आपली हयात घालवली. दहशतवादी हे मुस्लीमच असतात पण मालेगावमधील दहशती कारवायात हिंदूंचा सहभाग उघड झाल्यापासून दहशतवादाला जात-धर्म नसतो वगैरे अशा गोष्टी ते मान्य करू लागले; हेही काही थोडके नसे. दहशतवादी हा मुस्लीम असो वा हिंदू हा निंद्यच आहे. आधुनिक भारतात मुस्लीम लीगच्या राजकारणाला चेव आला हेही ह्या हिंदुत्ववाद्यांमुळेच आणि त्याचे पर्यवसान देशाची फाळणी होण्यात झाली. ब्रिटिशांना भारताची फाळणी हवीच होती कारण ती त्यांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग तर होतीच शिवाय हिंदू-मुस्लीम तेढ जर कायम राहिली तर साम्राज्यवादी धोरणाचा भाग म्हणून त्यांना ते फायद्याचेच होते.

राष्ट्रवादाच्या एवढ्या मोठ्या गप्पा मारणारे हिंदुत्ववादी स्वातंत्र्य चळवळीत कोठे होते? म्हणजे एकूणच हिंसेचे वातावरण चिघळत ठेवायचे, मुस्लीमद्वेष पसरवत राहायचे हाच एकमेव उद्योग यांनी केला. मुंबईत आणि गुजरातमध्ये जे दहशतवादी हल्ले झाले यामागे या सर्व हिंदुत्ववादी फॅसिस्ट प्रवृत्तींचा प्रसार कारणीभूत होता. महात्मा गांधींचा खून झाल्यानंतर निष्प्रभ झालेला रा. स्व. सं. अडवानींच्या रथयात्रेनंतर परत कार्यक्षम झाला. बाबरी मशीद पाडण्यात आली, त्याचबरोबर जमातवादी दंगली झाल्या. मुस्लीम जनतेला दुखावण्यात आले. तरीही जनता पक्षाच्या प्रयोगानंतर पद्धतशीरपणे संघपरिवार आपले काम करत राहिला. या सर्वाचा एकूण परिणाम मुंबई व इतरत्र जमातीय दंगली होण्यात झाला. पुढे या सर्वांचे उट्टे आंतरराष्ट्रीय कडव्या दहशतवादी मुस्लीम प्रतिगाम्यांनी काढला. यात हजारो दोन्हीही हिंदू आणि मुस्लीम निष्पाप लोकांचा बळी गेला. आता तर संघवाले सत्तेतच आहेत. गेल्या दीडएक वर्षात काय काय झाले हे आपण पाहतच आहोत. मुस्लीम हा त्यांचा शत्रू नंबर एक आहे. मुस्लिमांना दुय्यम नागरिकत्व देण्याचीही त्यांनी भाषा केली आहे. मुस्लिमांना असे असुरक्षित करून प्रगतीच्या वाटा तर खुंटणारच आहेत, शिवाय दहशतीच्या वातावरणामुळे सततचे असहिष्णुतेचे वातावरण तापलेलेच राहणार आहे. असहिष्णुतेचा प्रश्न निर्माण केलाच आहे. त्यांच्या अजेंड्यावरचा तो महत्त्वाचाच विषय आहे. मुस्लिमांनी भारतात राहूच नये असे त्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात अभिनेता आमीर खानचे प्रकरण काही काळ रंगले. या राज्यात हे असे सतत घडत राहणार. म्हणूनच प्रागतिक शक्तींनी सजग राहायला हवे. हे पुस्तक या संदर्भात अनेक गोष्टींचा उलगडा करत प्रतिगाम्यांच्या दिशा काय आहेत हे दाखवते. म्हणूनच या अशा विचित्र आणि विक्षिप्त वातावरणात युवा पिढीला प्रबोधन आणि योग्य दिशांचे मार्गदर्शन करण्यामध्ये हे पुस्तक महत्त्वाचे ठरते.

'कालबाह्य उठाठेव' आणि 'उतरंडीचे समर्थक' या दोन लेखांत जातीच्या राजकारणाचा उहापोह आहे. जातीचे परिमाण हे भारतीय समाजात मध्यवर्ती आहे. भारतीय इतिहासात जात हा घटक बळकट होण्यामागे उत्पादनपद्धत होती. तो एक केवळ मानसिक घटक नाही. आज भटक्या जमाती आणि आदिवासी समाजातील जातपंचायत ह्या गोष्टी आधुनिक भारतातील कायदा न मानणाऱ्या आहेत. ही संख्या आठ टक्क्यांपर्यंतची आहे. या जातपंचायती जातीअंतर्गत व्यवहाराचे नियमन करण्यासाठी निर्माण झाल्या असाव्यात. चातुर्वर्ण्य व्यवस्था ही प्राचीन भारतातील एक षड्यंत्र होते. त्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय तपशील या लेखांतून आलेला आहे. जात्याभिमान हा याचाच एक साइड इफेक्ट म्हणावा लागेल. हा वरिष्ठ जाती आणि शोषितांची पिळवणूक, जातीच्या राजकारणामुळे त्यांच्यावर होणारे अत्याचार याची एक सैद्धांतिक मांडणी 'खैरलांजीचा अन्वयार्थ' या लेखात आहे. याचबरोबर 'खरे दुखणे' या लेखात जाती आणि आरक्षणाची चर्चा आहे. गुणवत्तेच्या नावाखाली आपल्या जातीय मानसिकतेचे दर्शन उच्चजातीतील अभिजन वर्गही करताना दिसतात. सैन्यदलातही आरक्षण ठेवावे अशी मागणी करणारा हा वर्ग मग आपली मुले सैन्यात का पाठवत नाही? खरे तर सैन्यदलात उच्च जातींना आरक्षण ठेवलेच पाहिजे कारण सैन्यात शेतकरी, दलित आणि बहुजन समाजातील मुलेच असतात. पाच हजार वर्षे जातिभेदाच्या सांस्कृतिक राजकारणाचे बळी ठरलेल्या दलित आणि बहुजन समाजाकडून खोट्या आणि कृत्रिम गुणवत्तेची अपेक्षा करणे हे हास्यास्पद आहे. 'भेदाभेदाचा आलेख' हा लेख या प्रश्नावर प्रकाश टाकतो. कृष्णा इंगळे आणि आनंद तेलतुंबडे यांचे या लेखातील संदर्भ आणि तपशील लेखकाचे प्रतिपादन बळकट करणारे आहेत.

याशिवाय या पुस्तकात शेवटच्या दोन भागांत पुस्तक आणि चित्रपट परीक्षण आणि प्रासंगिकपर लेख समाविष्ट आहेत. एस. जी. सरदेसाई यांचे 'भारतीय तत्त्वज्ञान : सामाजिक संघर्ष', वि. भा. कोलते यांचे 'मराठी संतांची सामाजिक कामगिरी', प्रभाकर संझगिरी यांचे 'चार्वाक ते मार्क्स' आणि नलिनी पंडित यांचे 'आंबेडकर' अशी चार परीक्षणे या पुस्तकात आहेत. प्रत्येक परीक्षण हे अत्यंत चिकित्सक आणि अभ्यासू आहे. या परीक्षणांमुळे वाचक हा मूळ पुस्तकाकडे जाण्यास प्रेरित होईल असे वाटते. 'फँड्री' आणि 'देऊळ' या दोन उत्तम मराठी चित्रपटांचीही परीक्षणे फारच उद्‌बोधक आहेत. या सर्व परीक्षणांतून लेखक आपले मूळ मुद्दे आणि विचारांची पकड न सोडता वाचकांना सतत जात-जमातीचे राजकारण, दलितांचे प्रश्न, हिंदुत्ववाद्यांचे प्रतिगामी राजकारण, ढोंगी तथाकथित अभिजन वर्गाचे शेपूट ओढण्याचे काम करतो, हे फार महत्त्वाचे आहे असे वाटते.

सम्यक पब्लिकेशनने प्रसिद्ध केलेले 'वर्तमानाची बखर' हे पुस्तक आजच्या युवा पिढीने वाचायलाच हवे असे आहे. याची काही महत्त्वाची कारणेही आहेत. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या बहुराष्ट्रीय संस्कृतीच्या आक्रमणाने प्रागतिक संस्कृतीचे मानदंड निकालात निघत आहेत. समाजात अस्तित्व हरवल्याची भावना वाढीस लागली आहे. नव्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, नवउदारमतवादी धोरणांमुळे आणि त्यातील आंतरराष्ट्रीय अर्थकारणांमुळे आत्यंतिक व्यक्तिवाद, भोगवाद आणि समाजविरोधी संस्कृती वेगात प्रसरण पावत आहे. या पार्श्वभूमीवर आजचा तरुण एक तर गोंधळलेला आहे किंवा त्याला या सर्व गोष्टी अनभिज्ञच आहेत. या पुस्तकाची भूमिका या वर्गाला प्रबोधित करणारी आहे. या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित म्हणूनच करावे लागेल. सुभाष थोरात यांना यासाठी धन्यवाद, त्यांनी असे अजून नवे प्रकल्प हाती घ्यावेत असे वाटते. त्याची आजच्या युवा पिढीला खूप मोठी गरज आहे. विशेषतः आजच्या सांस्कृतिक गढुळीकरणाच्या काळात असे स्पष्ट, ठाम, चिकित्सक आणि बहुजन हिताय लेखनाची अधिक गरज आहे असे या पुस्तक परीक्षणाच्या निमित्ताने म्हणावेसे वाटते.

●

**वर्तमानाची बखर : सुभाष थोरात**
सम्यक पब्लिकेशन्स, २०१५
किंमत : रु. २००

---

**(संजीव चांदोरकर / पान ४३ वरून)**

भागातील एक पंचमांश नागरिकांना मिळणारे पाणी मानवी शरीरास घातक आहे. प्रायतः वीजनिर्मितीसाठी बांधण्यात येणाऱ्या अवाढव्य धरणांमुळे लागवडीखालील जमिनी पाण्याखाली जात आहेत, पर्यावरणीय हानी होत आहे व लाखो कुटुंबांना जबरदस्तीने स्थलांतर करावे लागत आहे. २००८ पर्यंत अमेरिका हा पर्यावरणाला हानी पोचवणारा कार्बन गॅसेस हवेत सोडणारा सर्वात मोठा देश होता, आता त्याची जागा चीनने घेतली आहे. साहजिकच प्रदूषणाच्या प्रश्नांवर सरकारी दफ्तरांमध्ये तक्रारी दाखल होण्याचे, त्यावर अर्जविनंत्या करण्याचे व वेळ पडलीच तर आंदोलने करण्याचे प्रमाण वाढले आहे. २००२ ते २००४ या तीन वर्षात दरवर्षी सरासरी अशा ६ लाख प्रकरणांची नोंद झाली आहे; अर्थात शासकीय प्रवक्ते हा आकडा खूपच कमी सांगत असतात.

चीनमधील श्रमाची कामे करणारे औद्योगिक कामगार हे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून आलेले, तरंगते, ज्यांना शहरांमध्ये कायमस्वरूपी स्थायिक होण्याची परवानगी नसणारे आहेत हे आपण बघितले आहे. शहरात राहण्याची नीट सुविधा नसल्यामुळे, शहरातील प्रदूषणाचे ते बळी ठरत असतात, तर ते ज्यावेळी ग्रामीण भागात आपल्या गावात परततात त्यावेळी तेथील पर्यावरणीय ऱ्हासाला त्यांना तोंड द्यावे लागते. दुसऱ्या शब्दात चीनमधील पर्यावरणीय प्रश्नांची जास्त किंमत हा वर्ग मोजत आहे.

●

*(जॉन बेलामी फोस्टर आणि रॉबर्ट मेकेस्नी यांनी लिहिलेल्या व मंथली रिव्ह्यू प्रकाशनाने जून २०१३ मध्ये प्रकाशित केलेल्या 'The Endless Crisis' या पुस्तकातील 'The Great Stagnation and China' या मथळ्याच्या सहाव्या प्रकरणाचे (पान क्र. १५५ ते १८३) स्वैर रूपांतर.)*